# येथे कर आमुचे जुळती!

नवमहाराष्ट्र संघाचे ज्येष्ठ प्रशिक्षक सुरेश दिनकर यांच्या खो-खो कारकीर्दीस यंदा पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. अनेक राष्ट्रीय विजेते आणि पुरस्कार विजेते खेळाडू घडविणाऱ्या दिनकरसरांचा उत्साह आजही एखाद्या तरूण संघटकास लाजविणारा आहे.

१९७१ साली स. प. महाविद्यालयात असलेल्या खो-खोच्या क्रीडांगणावर प्रथमच गेले होते. त्यावेळी एक गृहस्थ खणखणीत आवाजात खो-खोच्या मुलींच्या संघाचा सराव घेत होते. सरावाच्या वेळी दिल्या जाणाऱ्या सूचना अत्यंत मनापासून, जीव ओतून अन् कळकळीने आहेत, हे नवख्या माणसालाही जाणवेल अशा! व्यक्तिमत्त्व देखणे, बोलणे अदबशीर, हालचालीत चपळता! तेवढ्यात कुणीतरी दिनकरसर अशी हाक मारली. त्यामुळे त्या व्यक्तीचे नाव दिनकर हे लक्षात आले. बऱ्याच दिवसांनंतर मला समजले की, ते त्यांचे आडनाव आहे.

श्री. सुरेश विनायक दिनकर. खो-खो या देशी खेळावर अतोनात प्रेम करणारे! ५० वर्षांहून अधिक काळ नवमहाराष्ट्र संघाशी निगडित व्यक्तिमत्त्व!

शालेय जीवनापासूनच क्रीडांगणाची आणि व्यायामाची ओढ. कै. शंकरराव पाटणकर, कै. लागवणकर (वैद्य), गुरुवर्य कृ. भा. मोडकसर आणि कै. बी. आर. जोशी या क्रीडादिग्गजांचे मार्गदर्शन दिनकरसरांना लाभले. साहजिकच क्रीडांगणाशी अतूट नाते निर्माण झाले.

खो-खो, आट्यापाट्या, कबड्डी या खेळांत पारंगत असूनही खो-खोची निवड सरांनी केली अन् त्याच खेळासाठी सर्व काही सर्वतोपरी करायचे निश्चित झाले.

संरक्षण करताना चौघातल्या खेळासाठी विशेष कौशल्य आत्मसात होते. आक्रमणात सूर मारून गडी टिपणे, खुंटावर फसवा खो देणे, खुंटात हात टाकून बाद करणे, अशा हल्ली अभावानेच आढळणाऱ्या सर्व कौशल्यांवर सरांनी अनेक विजय सहजी संपादन केले.

आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये पुणे विद्यापीठाचे तीन वेळा प्रतिनिधित्व केले. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना १९६५ इंदोर व १९६६ कऱ्हाड या स्पर्धेत उपकर्णधारपद भूषवित विजयश्री प्राप्त केली.

रसायनशास्त्राचे पदवीधर असलेल्या सरांनी हायएक्स्प्लोझिव्ह कंपनीत रसायन-परीक्षक म्हणून विशेष काम केले. त्याबद्दल कंपनीतर्फे गुणवंत



सुरेश दिनकर

कामगार पुरस्काराने सन्मानित केले. खो-खो खेळावर नितांत प्रेम करणारे दिनकरसर हेच मला एक प्रभावी रसायन वाटते.

१९६०-६१ मध्ये स्थापन झालेल्या नवमहाराष्ट्रचे संस्थापक सदस्य. १९६५-६६ मध्ये स्थापन झालेल्या आर्य क्रीडोद्धारक महिला संघाचे संस्थापक सदस्य. या दोन्ही संघांचे अध्यक्षपद सरांनी अनेक वर्षे भूषविले. पुणे जिल्हा खो-खो संघटनेचेही ते अध्यक्ष होते.१९७२ मध्ये सरांनी राष्ट्रीय क्रीडा संस्था (पतियाळा) यांनी आयोजित केलेला प्रशिक्षकाचा अभ्यासक्रम प्रथम क्रमांक संपादून आपल्या अभ्यासूपणाची साक्ष दिली.

मार्गदर्शक म्हणून सरांनी काम केलेल्या चार राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने केलेली कामगिरी १) कुमार गट - १९७० हैदराबाद - प्रथम क्रमांक, २) महिला गट - १९७० बारामती तृतीय क्रमांक, ३) पुरुष गट - १९७२ औरय्या - प्रथम क्रमांक.

याशिवाय आंतरविद्यापीठ स्पर्धा, पश्चिम विभागीय स्पर्धा, फेडरेशन कप अशा विविध स्पर्धांचे मार्गदर्शकपद यशस्वीरीत्या भूषविले. निवड समिती सदस्य म्हणूनही अचूक काम करणारे अशीच सरांची ख्याती! भारतीय खो-खो महासंघाचे ते १९९६-२००० या कालावधीत उपाध्यक्ष होते.

तंत्रज्ञ अधिकारी म्हणून सरांनी नवमहाराष्ट्र संघाने आयोजित केलेल्या सर्व स्पर्धा एशियन, इंटरनॅशनल कॉम्पिटिशन कलकत्ता, नॅशनल फेडरेशन कप सिलीगुडी येथे आपल्या कामाचा ठसा उमटविला. गेल्या चार दशकांत आपल्या मार्गदर्शनाखाली खेळाची कारकीर्द घडविणारे अनेक खेळाडू सरांनी घडविले. श्रीरंग इनामदार- अर्जुन ॲवॉर्ड, डॉ. प्रकाश शेठ, विलास देशमुख, रमेश राव यासारखे छत्रपती पुरस्कार विजेते, तर एकलव्य पुरस्कार, जानकी पुरस्कार असे अनेक मानकरी सरांनी घडविले.

ज्या ओढीने सर आजही कार्यरत आहेत त्याला खरोखर तोड नाही. शाळा, महाविद्यालयांत जाऊन मुले-मुली निवडणे, त्यांना क्रीडांगणावर येण्यासाठी प्रोत्साहित करणे, पालकांच्या सभा घेणे, क्रीडांगणावर मोकळ्या हवेत खेळण्याचे महत्त्व विशद करणे, अशा एक ना अनेक गोष्टी सर आपुलकीने करतात.

रोज सकाळी क्रीडांगणावर फिरताना खो-खोच्या ग्राऊंडची निगराणी ही सर त्याच ओढीने करतात. सर्वांना न दुखवता बरोबर घेऊन जाण्याचे वादातीत कसब सरांकडे आहे. अजातशत्रू अशी ओळख निर्माण करताना 'धर्मराज' ही बिरुदावली त्यांच्यासह खेळाडूंनी दिली आहे. सृजन शब्दाचा अर्थ म्हणजेच दिनकरसर असेच माझ्या मनात येते.

दिनकरसरांच्या पत्नी सौ. मंगला या खो-खो परिवारात सर्वदूर 'वहिनी' या नावाने परिचित आहेत. त्या वहिनी या नात्याचे मांगल्य जपतात. संघातील सर्व सदस्यांना वहिनीविषयी तितकाच आदर वाटतो. सरांच्या या वाटचालीत वहिनींचे योगदानही तितकेच महत्त्वाचे!

नवमहाराष्ट्र संघाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात आयोजित होत असलेल्या अखिल भारतीय खो-खो स्पर्धेत संघाच्या या अनुभवी, कुशल, निरपेक्ष, कार्यरत अशा ज्येष्ठ गुरूला नवमहाराष्ट्र संघ, समस्त खो-खोप्रेमी, क्रीडा रसिकांतर्फे अत्यंत आदरपूर्वक 'गुरू गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

सरांना आजवर प्रतिष्ठेचे अनेक पुरस्कार लाभले, पण शासनदरबारी त्यांची दखल घेतली गेली नाही. खेळाडूंकडून उत्स्फूर्तपणे मिळालेली दाद म्हणजेच हा 'गुरू-गौरव पुरस्कार' सरांवरील प्रेमाची पावतीच जणू!

अ. भा. खो-खो स्पर्धेत दि. ११ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. त्यांच्या कर्मभूमीत होणाऱ्या म्हणजे सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर होणाऱ्या या सोहळ्याला उपस्थित राहून आदर व्यक्त करण्याची ही सुवर्णसंधी व आग्रहपूर्वक निमंत्रण आपणांसाठी!

खो-खोतील या सदाबहार व्यक्तिमत्त्वाला समृद्ध व आरोग्यदायी आयु लाभो हीच प्रार्थना!

खो-खोमध्ये तेजोमणी 'दिनकर'
आदराने क्रीडापटू नतमस्तक जोडोनी कर
गुरुदक्षिणा ही 'गुरू गौरव पुरस्कार'
वंदूनी विनवितो सारे, करावा स्वीकार

- शैला पटवर्धन